# स्त्रीमुक्तीचे उदगाते: महात्मा गांधी

**डॉ. रचना सचिन माने,** स. ब. खाडे महाविद्यालय, कोपार्ड,भ्रमणध्वनी ९४०३८४६२७५

---

शतकानुशतकाच्या सुप्तावस्थेतील स्त्रीशक्तीला आवाहन देणारे म. गांधी हे महत्त्वाचे विचारवंत, समाजसुधारक हेते. धर्मसंस्कारांनी प्रभावित समाजमन व राजकीय गतिशास्त्र या दोन्हीची गांधीजींनी सांगड घातली. आपापसातील विचारभेदामध्येच गुंतून पडलेल्या भारतीय मनाला एक जाज्वल्य ध्येयाखाली एकत्र आणले. समाजाला पोखरणाऱ्या प्रश्नांचा सर्वांगीण परिचय करून दिला. ते प्रश्न सोडवण्याच्या दिशेने वाटचाल करण्यास प्रवृत्त केले. समाजातील स्त्रीच्या स्थानाचा विशेष विचार केला. स्वातंत्र्य समता, बंधुभाव या नीतिमूल्यांना प्रमाण मानणाऱ्या गांधीजींनी सर्व जाती धर्मातील स्त्री-पुरुष समानतेचा व समान राजकीय, सामाजिक हक्कांचा पुरस्कार केला.

स्त्री शिक्षणविषयक विचार व्यक्त करताना म. गांधी म्हणतात, आत्माविष्काराचे साधन असणारे शिक्षण पुरुषांबरोबर स्त्रियांनाही मिळाले पाहिजे. स्त्रियांच्या स्वहक्काच्या जाणिवेसाठी, आत्मभानासाठी त्याचप्रमाणे भारताच्या सर्वांगीण विकासासाठी समाजाचा निम्मा हिस्सा असणारी स्त्री शिक्षि असणे आवश्यक आहे.

१९२० नंतर स्त्री सुधारणा व सामाजिक सुधारणा जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू ठरल्या. पांढरपेशा वर्गातील पुरुषांपुरताच मर्यादित असणारा स्वातंत्र्यलढा गांधीजींच्या नेतृत्वात स्त्रियांपर्यत पोहोचला. स्त्रियांमध्ये असणाऱ्या शारीरिक बळापेक्षा श्रेष्ठ अशा नैतिक बळाची जाणीव झालेल्या गांधीजींनी स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्यासाठी स्त्रियांना आवाहन केले. या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद मिळाला व शतकानुशतके घराच्या चार भिंतीत कोंडलेली स्त्री शक्ती प्रथमच बाहेर पडली. स्वातंत्र्यलठ्यात सहभागी झाली. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक आघाड्यांवर तिने स्वतःचे कर्तृत्व सिद्ध करून दाखवले. ती निर्भम व आत्मविश्वासू बनली. गांधीजींनी स्त्रियांना राजकीय व सामाजिक क्षेत्रात कृतिशील सहभाग मिळवून दिला. स्त्रियांनी चळवळीत निर्भयपणे वावरावे यासाठी स्त्री-पुरुषांमधील नात्यामध्ये मूलभूत बदल करण्याची आवश्यकता ओळखली. त्यासाठी स्त्री-पुरुषांना लैंगिक दमनाचा मार्ग सांगितला. त्यामुळे स्त्रियांनी स्वातंत्र्य चळवळीत स्वतःला निर्भयपणे झोकून दिले. गांधीजींनी स्त्रियांना स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्याचे केलेले आवाहन भारतीय स्त्रीच्या जीवनात नवे युग आणणारे ठरले. या काळात स्त्रियांच्या विविध प्रश्नांकडे उपेक्षेने वा तुच्छतेने नपाहता राष्ट्रीय व सामाजिक प्रश्न म्हणून पाहिले जाऊ लागले. शतकानुशतके बंदिस्त असणाऱ्या स्त्रीला बाहेरच्या विश्वात आणण्याचे व सत्याग्रहात सामील करण्याचे ऐतिहासिक कार्य म. गांधीनी केले.

गांधीजींमुळे स्त्रीला सार्वजनिक जीवनात नवी प्रतिष्ठा मिळाली. आत्मभान मिळाले. गांधीजींनी स्त्रीला घरातून बाहेर काढून तिच्या राजकारणातील सहभागास मिळवून दिलेली समाजमान्यता ही स्त्रियांच्या इतिहासातील अभूतपूर्व घटना होती. गांधीजींनी संमती वयाला, विधवा पुनर्विवाहाला, घटस्फोटाच्या अधिकाराला मान्यता दिली. गांधीजींच्या मते अबला ठरवून दुय्यमत्व लादलेल्या, त्याग व अहिसेची मूर्ती असणाऱ्या श्रेष्ठ स्त्रीने स्वसामर्थ्य ओळखावे. स्त्रीने स्वतःचे शील, अब्रू वाचविण्यासाठी पुरुषांवर अवलंबून राहू नये. आपली अब्रू, स्वाभिमान याला आपल्या स्वत:च्या इच्छेविरुद्ध ठेच लागत नाही. स्त्रीवर बलात्कार झाला म्हणून स्त्री भ्रष्ट होत नाही. या विचाराद्वारे योनिशुचित्वाच्या पारंपरिक संकेतांना त्यांनी छेद दिला. अशा अन्यायग्रस्त स्त्रीकडे बघण्याचा नवा दृष्टिकोण समाजाला दिला. गांधीजींच्या मते त्याग, सोशिकता, नम्रता, निष्ठा, ज्ञान यांची मूर्ती असणाऱ्या स्त्रीला स्वत:च्या हृदयाच्या गाभ्यात असणाऱ्या अहिसेचे सामर्थ्य ज्यावेळी लक्षात येईल त्यावेळी ती अबला न ठरता सबला बनेल.

स्त्रीकडे माणूस म्हणून पाहणारे गांधीजी कुटुंबांतर्गत व्यक्ती म्हणून तिची प्रतिष्ठा व स्वायत्ततेबाबत आग्रह धरतात. स्त्रीला असणाऱ्या पतीला नकार देण्याच्या अधिकाराची, स्त्री पुरुषाच्या उपभोगाचे साधन नसल्याची, पुरुषांनी लादलेली न्यूनगंडाची भावना सोडून कुटुंबातील व समाजातील आपल्या योग्य स्थानासाठी स्वत: प्रयत्नशील होण्याची जाणीव करून दिली. स्त्रीत आत्मभान, सामर्थ्य येण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता

प्रतिपादली. एकूणच स्त्रियांमध्ये आत्मविश्वास जागृत करणे, त्यांना धैर्यशील बनविणे, स्वसमस्या निवारणासठी संघर्षशील बनविणे यासाठी गांधीजी प्रयत्नशील होते. स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी गांधीजींनी स्त्रियांना सर्व प्रकारचे समान हक्क, समान कायदे, समानतेची वागणूक, आवडीचे कार्यक्षेत्र निवडण्याची, इच्छित कार्य करण्याची मुभा, योग्य शिक्षण यांचा पुरस्कार केला. “लग्न हेच स्त्रीचे जीवनसाध्य मानणाऱ्या कर्मठ समाजाच्या पारंपरिक मानसिकतेला म. गांधींनी छेद दिला. स्त्री कुटुंबाबाहेर स्वत:चे कार्यक्षेत्र निर्माण करू शकते, अविवाहित राहून राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात, नवसमाजनिर्मितीच्या कार्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकते असे सांगून स्त्रीकर्तृत्वाला संधी देणारे विस्तीर्ण जीवनावकाश त्यांनी उलगडले.

गांधीजींनी स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांना सहभागी करून घेऊन तिच्या शतकानुशतकाच्या बेड्या तोडल्या. तिच्यात बाहेरच्या जगात वावरण्याचा आत्मविश्वास आणला. समाजव्यवस्थेतील स्त्रीचे दुय्यम स्थान नाकारले. स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. अनिष्ट रूढी-परंपरांना विरोध करून स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. कुटीरोद्योगाद्वारे तिला स्वावलंबी बनविले. स्त्रीला समाजजीवनात प्रतिष्ठा व समानतेचे स्थान दिले. साऱ्या जगाला स्त्रीशक्तीची, स्त्रीकर्तत्वाची ओळख करून दिली. स्वसामर्थ्याची, स्वतःतील क्षमतांची जाणीव झालेल्या स्त्रीने स्वातंत्र्य चळवळीप्रमाणेच जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला. आत्मभान आलेली, स्वत्वाची जाण आलेली ही स्त्री आपल्या न्याय्य हक्कांसाठी संघर्षास सिद्ध झाली. त्यातूनच पुढे स्त्रीमुक्ती चळवळीचा, स्त्रीवादी विचारप्रणालीचा उदय झाला. आज सुशिक्षित, स्वतंत्र, विचारी, आत्मविश्वासाने परिपूर्ण, अनुभवांनी परिपक्व, स्वावलंबी, आत्मभान व स्वत्व याची जाण आलेली जो स्त्री दिसते आहे त्याचे श्रेय गांधीजींना जाते. या सगळयांची बीजे स्त्रीमध्ये रुजविण्याचे काम गांधीजींनी केले. म्हणूनच गांधीजींचे कार्य स्त्रीमुक्तीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे..

**संदर्भग्रंथ**

१) ताटके, अरविंद, महात्मा गांधी, पुणे, सरिता प्रकाशन, प्र. आ. १९९४
२) मोहनराव, यु. एस.(संक.-संपा.), महात्मा गांधींचा संदेश , नवी दिल्ली, माहिती व नभोवाणी मंत्रालय, भारत सरकार, जून १९६९
३) सहस्रबुद्धे, अण्णासाहेब, लमये, माधवपुरुषोत्तम (अनु.), 'म.गांधीजींचे मानस, प्रभू, आर. के., रावल, यू. आर. (संपा.), पुणे, प्रकाशन- सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला मंडळ १९४९
४) पांढरीपांडे, सु. श्री., गांधीवाद आणि स्त्रीवाद, स्त्रीवादी समीक्षा : संकल्पना आणि उपयोजन , वरखेडे मंगला(संपा.)
५) जोशी, ग. ना., महात्मा गांधी विचार-विमर्श , मुंबई, मॅजेस्टिक प्रकाशन, प्र. आ. २००५,